मुलभूत प्रशिक्षण सत्र क्र. २८

पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर येथे महाराष्ट्रातील बृहन्मुंबई, नवी मुंबई, मिरा भाईंदर, पुणे शहर, पिंपरी चिंचवड, नाशिक शहर, छ.संभाजी नगर शहर, अमरावती शहर, लोहमार्ग मुंबई, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, जळगांव, छ.संभाजीनगर ग्रामीण, जालना, बीड, अमरावती ग्रामीण, अकोला, बुलढाणा, नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली, लोहमार्ग छ.संभाजी नगर व नागपूर लोहमार्ग या आस्थापनेवर भरती झालेले सत्र क्र २८ मधील १३२५ नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थी यांचा दीक्षांत संचलन समारंभ दिनांक २४/०३/२०२६ रोजी सकाळी ०८.०० ते ९.०० वा. च्या दरम्यान संपन्न झाला. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन **मा. श्री. विनय कुमार चौबे, (भा.पो.से.), पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** हे उपस्थित होते. सदर समारंभात प्रशिक्षणार्थी यांनी मान्यवरांना मान वंदना दिली, प्रमुख पाहुणे यांनी परेडचे निरीक्षण केले. त्यानंतर दीक्षांत संचलन समारंभातील प्रशिक्षणार्थीनी संचलन केले. परेड कमांडर रोल नं. ५०८ अमोल विनायक राठोड, मुळ घटक - मुंबई शहर व दुय्यम कंमाडर म्हणून रोल नं. २८९ सागर सुरेश वायदंडे, मुळ घटक- मुंबई शहर हे होते. परेड कमांडर रोल नं. ५०८ अमोल विनायक राठोड, यांनी परेड मार्च केली. सदर दीक्षांत संचलनामध्ये १० प्लाटून (३३० प्रशिक्षणार्थी) चा सहभाग होता. त्यानंतर झालेल्या निष्क्रमण संचलनामध्ये १३२५ नवप्रविष्ट पोलीस शिपाई यांनी सहभाग घेतला. नवप्रविष्ट पोलीस प्रशिक्षणार्थी यांनी कर्तव्यनिष्ठेची, प्रामाणिकतेची शपथ घेतली. सदर परेड करीता बँन्ड पथकात सोलापूर शहर, सोलापूर ग्रामीण व राज्य राखीव बल गट क्र. १०, सोलापूर पोलीस दलाचे पथक हजर होते. सदर सत्रामध्ये खालील प्रशिक्षणार्थीना बक्षिस व प्रमाणपत्र देवून त्यांचा गौरव केला.

अ.क्र.	तपशिल	प्रशिक्षणार्थीचे नांव
१	आंतरवर्ग व बाह्यवर्ग प्रथम	रोल नं. १४१ प्रदिप हनुमंत बि-हामणे- मुंबई शहर
२	आंतरवर्ग व बाह्यवर्ग द्वितीय	रोल नं. ५९६ रोहित बंडू शेवाळ - मुंबई शहर
३	आंतरवर्ग प्रथम	रोल नं. १४१ प्रदिप हनुमंत बि-हामणे- मुंबई शहर
४	बाह्यवर्ग प्रथम	रोल न. १७८ संदीप ताराचंद राठोड - मुंबई शहर
५	विषय क्र. ०१ ते ०३ प्रथम	रोल नं. ११४५ संतोष शहाजी शेलार - मुंबई शहर
६	विषय क्र. ०४ ते ०८ प्रथम	रोल नं. ५६० तुषार भास्कर गोमासे - मुंबई शहर
७	कमांडो प्रशिक्षण प्रथम	रोल नं. २८२ ओंकार सुभाष डवणे - मुंबई शहर
८	पीटी प्रथम	रोल नं. ६८९ मुज्जू मोहिन शेख - लातुर
९	गोळीबार सराव प्रथम	रोल नं. २६६ राहुल आजिनाथ आघाव - मुंबई शहर
१०	बेस्ट खेळाडू अँथलॅटीक्स	रोल नं. १०५२ संजय मारुती झाकणे - मुंबई शहर

त्याच बरोबर सदर सत्रामध्ये आंतरवर्ग व बाहयवर्गाचे कामकाज उत्कृष्ट रित्या पार पाडलेने, खालील नमूद पोलीस अधिकारी / अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांचा प्रशंसापत्र देऊन गौरव करण्यात आला.

अ.क्र.	अधिकारी/अंमलदार/लिपीक यांचे नांव	तपशिल
१	श्री. सुरेश विठ्ठल निंबाळकर, प्र.उप प्राचार्य	अंतिम परिक्षा उत्कृष्ठ नियोजन
२.	पोनि श्रीकृष्ण लक्ष्मणराव कटकधोंड	आंतरवर्ग समन्वय अधिकारी
३.	पोनि संगीता मल्लप्पा हत्ती	आंतरवर्ग समन्वय अधिकारी
४.	पोनि पांडुरंग श्रीरंग भोपळे	आंतरवर्ग समन्वय अधिकारी
५.	पोनि भगवान बापु शिंदे	उत्कृष्ट मेस व्यवस्थापन
६.	रापोनि शहादेव रामभाऊ पोकळे	बाह्यवर्ग प्रशिक्षण उत्कृष्ठ कामगिरी
७.	रापोनि संजीव महादेवराव नागे	बाह्यवर्ग प्रशिक्षण उत्कृष्ठ कामगिरी
८.	रापोनि महेश शिवराम साळवी	बाह्यवर्ग प्रशिक्षण उत्कृष्ठ कामगिरी
९.	पोउपनि गणेश कोल्हाळ	आंतरवर्ग प्रशिक्षण उत्कृष्ठ कामगिरी
१०.	सपोउपनि महेश व्यंकटेश थोरात	कवायत निदेशक उत्कृष्ठ कामगिरी
११.	पोह/७१८ ईश्वर रंगनाथ सांगोलकर	कवायत निदेशक उत्कृष्ठ कामगिरी
१२.	पोना/४६३ शिवाजी जयराम भोसले	कवायत निदेशक उत्कृष्ठ कामगिरी
१३.	पोशि/१५७२ नंदकुमार उत्तरेश्वर आग्रे	कवायत निदेशक उत्कृष्ठ कामगिरी
१४.	वश्रेलि देविदास दिगंबर पिसे	सत्राचे उत्कृष्ट प्रशासकीय कामकाज
१५.	कश्रेलि महेश पोपट भागवत	सत्राचे उत्कृष्ट प्रशासकीय कामकाज

सदर दीक्षांत संमारंभाच्या अनुषगांने मा. प्राचार्य, श्री. विजयकुमार चव्हाण सर यांनी अहवाल वाचन केले त्यामध्ये त्यांनी सत्र क्र २८ चे प्रशिक्षण हे दि. २३/०६/२०२५ ते २४/०३/२०२६ दरम्यान झाल्याचे सांगुन सदर सत्राकरीता महाराष्ट्रातील विविध घटकातुन आलेल्या १३२५ प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण दिल्याचे सांगितले.

एकुण प्रशिक्षणार्थीपैकी १५% हे माजी सैनिक, ६% प्रशिक्षणार्थी हे अनुकंपा, ४३% प्रशिक्षणार्थी हे पदवीधर, ३% प्रशिक्षणार्थी हे पदव्युत्तर असून त्यामधील २% प्रशिक्षणार्थी हे संगणक आणि विशेष शाखेतील पदवी / पदविकाधारक असून २% प्रशिक्षणार्थी हे अभियंता आणि ०१ प्रशिक्षणार्थी कायदद्याचे पदवीधारक आहेत. ०९ महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीत त्यांना आंतरवर्गात भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, भारतीय साक्ष अधिनियम आणि स्थानिक व विशेष कायदे, फॉरेन्सिक सायन्स, सायबर क्राईम, गुन्हेगारी शास्त्र, पोलीस संघटन, शास्त्रोक्त तपास, तपासाच्या कार्यपध्दती अशा विविध विषयाचे उत्तम शिक्षण दिले तसेच बाहयवर्ग प्रशिक्षणात परेड / कवायत व्दारे शारीरीक व मानसिक दृष्ट्या कणखर व सक्षम बनविण्याचे प्रशिक्षण दिले. याशिवाय प्रशिक्षणार्थींचे कलागुणांना वाव देण्याकरीता सांस्कृतिक कार्यक्रम, पेंटींग, गायन, वादन, हस्ताक्षर इ. छंद वर्गाचे आयोजन केले. त्याकरीता आंतरवर्ग, बाहयवर्ग अधिकारी, विधी निर्देशक व कवायत निर्देशक यांनी परीश्रम घेतलेचे सांगितले.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले मा. श्री. विनय कुमार चौबे (भापोसे) पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात, आपण आज शारिरिक, मानसिक, बौद्धिक पातळीवर सर्वतोपरी तयार होऊन, अद्ययावत प्रशिक्षण घेऊन देशाची, जनतेची सेवा करण्याकरीता बाहेर पडत आहात, हा क्षण तुमच्या आयुष्यात बदल घडविणारा, तुमचे व्यक्तिमत्व दैदिप्यमान करणारा क्षण आहे, असे प्रतिपादन केले. तुमच्याकडून देशातील दुर्बल घटकांना, अडीअडचणीतील जनतेला खुप अपेक्षा आहेत. तुम्ही तुमच्या प्रशिक्षणाचा, अधिकाराचा, ज्ञानाचा वापर जनतेला सर्वतोपरी सहाय्य करण्याकरीता करावा व जनतेला योग्य मार्गदर्शन करावे, तुम्हास जनतेची सेवा करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

सद्यस्थितीला नवनवीन तंत्रज्ञान आले आहे, त्यानुसार स्वत:ला अपडेट करा, जबाबदारीने वागा, शिस्तप्रिय जिवन जगा व जनतेला सहकार्य करा, असा मोलाचा सल्ला प्रमुख पाहुण्यांनी दिला.

सदर कार्यक्रमास मा. श्री. एम. राज कुमार, (भा.पो.से.), पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, श्री. अतुल कुलकर्णी, (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, डॉ. अश्विनी पाटील, (म.पो.से.), पोलीस उपायुक्त (गुन्हे), सोलापूर शहर, श्री. गौहर हसन, (भा.पो.से.), पोलीस उपायुक्त (मुख्यालय), सोलापूर शहर, श्री अशोक सायकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शी उपविभाग, विविध विभागाचे सन्माननीय अधिकारी, विविध शिक्षण संस्थांचे सन्माननीय प्राचार्य, पोलीस विभागाचे सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी, पत्रकार बांधव तसेच विविध घटकातील मान्यवर, आंतरवर्ग, बाहयवर्ग अधिकारी, कर्मचारी, मंत्रालयीन अधिकारी-कर्मचारी, वर्ग-४ कर्मचारी, प्रशिक्षणार्थींचे पालक, नातेवाईक मोठया संख्येने हजर होते.

सदरचा समारंभ सोहळा शिस्तबध्दपणे उत्साहात, आनंदात पार पडला, प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचा आंनद प्रशिक्षणार्थीच्या चेह-यावर दिसत होता. कार्यक्रमाचे सूत्र संचालन पोउपनि शुभांगी कोल्हाळ व पोह बसवराज परगोंडा यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी पोनि सुरेश निंबाळकर, उप-प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर यांनी उपस्थित मान्यवरांचे तसेच उपस्थितांचे आभार मानले.

जय हिंद !